दै. देशोन्नती दि. 09/11/2025



# खून प्रकरणातील आरोपीचा पोलिसांनी झुडूपातुन २४ तासात घेतला शोध

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड** : सिडको परिसरात खून करून फरार झालेल्या जखमी आरोपीच्या २४ तासात मुसक्या आवळण्यात स्थानिक गून्हे शाखेच्या पथकाला यश आले असून रक्ताने माखलेल्या आरोपीस येथील गोविंद कॉलनी परिसरातील झुडुपातून अटक केली.

सिडको भागातील संभाजी चौक परिसरात आरोपी साईनाथ सुभाष वट्टमवार (१९) रा. संभाजी चौक सिडको हा शुभम भद्रे याचा खून करून ब्लेडने वार केल्यामुळे जखमी अवस्थेत फरार झाला होता. त्याच्या शोधार्थ पोलिस अधिकारी व अंमलदारांचे पथक तयार करुन गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेऊन त्यांना अटक करणेबाबत पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी स्थानिक गून्हे शाखेचे पोनि उदय खंडेराय यांना आदेशित केले होते. त्यावरुन पोनि खंडेराय यांनी आदेशित केलेले स्थागुशाचे सपोनि विठ्ठल घोगरे, पोउपनि मिलींद सोनकांबळे व पोलीस अंमलदार यांच्या पथकास गुप्त बातमीदारांच्या माहितीवरुन व सायबर सेलने पुरविलेल्या तांत्रिक माहितीवरुन सदर गुन्ह्यातील आरोपी हा गोविंद कॉलनीचे पाठीमागील झाडीत असल्याची माहीती मिळाली. या माहितीवरून त्यांनी आरोपी साई वट्टमवार याचा शोध घेतला असता दुपारी ३.१० वाजण्याच्या सुमारास जखमी अवस्थेत, मानेवर उजव्या बाजुने बॅण्डेज पट्टी व शर्टावर रक्तासारखे डाग पडलेल्या अवस्थेत मिळुन आला. सदर आरोपीस ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी नांदेड ग्रामीण पोलिसांच्या स्वाधीन केले. या कारवाई पथकात पोहेकॉ रवी बामणे, अकबर पठाण, अजहर शेख, चंद्रकांत स्वामी, अनिल बिरादार, राजू सिटीकर, दीपक ओढणे व ईतर पोलिस कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

## खुनाचा प्रयत्न; तिघांविरुध्द गुन्हा दाखल

सिडको येथे ६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी आरोपी शुभम भद्रे, चिकु वंजारे , रितेश माळी पाटील सर्व रा. संभाजी चौक सिडको यांनी संगणमत करून पार्टी देण्याचे कारणावरून वाद करून साईनाथ वट्टमवार याच्या ब्लेडने गळयावर मारुन गंभीर जखमी करून खुन करण्याचा प्रयत्न केला व दगडाने मारहाण केली. या प्रकरणी साईनाथ वट्टमवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.